महाराष्ट्र शासन

फोन नं. ०२२-६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्र. ४/विकामुं/तांशा/शिष्यवृत्ती/२०२४/ दिनांक :

**तात्काळ**

## परिपत्रक

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमास शै.व. २०२४-२५ पासून प्रवेश घेतलेल्या व याआधी प्रवेशित मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १००% लाभ शासनामार्फत देण्यात येणार असूनही, शैक्षणिक संस्थांकडून मुलींना प्रवेशाच्यावेळी सदर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करण्यात येत असलेल्या विद्यार्थीनींच्या तक्रारीबाबत. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.नि.क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.परि.क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११, दि. २३/०७/२०२४
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तांशा/शिष्यवृत्ती/२०२४/२६५६, दि. २९/०७/२०२४
५. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६, दि. १२/०८/२०२४

सर्व पदविका संस्था, व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांनी सोबत जोडलेले मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या संदर्भीय क्र.५च्या परिपत्रकाचे अवलोकन करावे.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय १चा शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानीत अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानीत (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानीत महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्याक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जांचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शेक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच संदर्भीय शासन निर्णय क्र.२च्या शासन परिपत्रकान्वये उपरोक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तंत्रशिक्षण संचालनालयाचे संदर्भीय क्र.३च्या पत्रातील निर्देशानुसार या कार्यालयाचे संदर्भीय क्र. ४च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधीत संस्थांनी शै.व.२०२४-२५ पासून मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १००% लाभ शासनामार्फत देण्यात येणार असून, संदर्भ क्र. २च्या शासन परिपत्रकानुसार आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, राज्यातील काही शैक्षणिक संस्थांमार्फत मुलींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत सक्ती करण्यात येत आहे.

...२.

याबाबत मुलींना शासनास किंवा संचालनालयास तक्रार करणेकरिता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर खालील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

Helpline Numbers – 7969134440 / 7969134441
Helplinedesk Ticket Link – helpdesk.maharashtracet.org

तरी सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यात येते की, वरील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींना माहिती होण्याकरिता संस्थेच्या दर्शनीभागी तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

ज्या संस्था वरील सुचनांचे पालन करणार नाहीत अशा संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन अशा संस्थेवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

Signed by
Pramod A Naik
Date: 20-08-2024 15:49:35

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रति,
संचालक/कुलसचिव/प्राचार्य,
सर्व संबंधित शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था

प्रत माहितीसाठी : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

F/C

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्र:- १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६

**परिपत्रक-**

दिनांक :- १२ /०८ /२०२४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

**विषय:** व्यावसायिक अभ्यासक्रमांस शै.वर्ष २०२४-२५ पासून प्रवेश घेतलेल्या व याआधी प्रवेशित मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ शासनामार्फत देण्यात येणार असूनही, शैक्षणिक संस्थांकडून मुलींना प्रवेशावेळी सदर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करण्यात येत असलेल्या विद्यार्थीनीच्या तक्रारीबाबत ..

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४,दि.१९/०७/२०२४.
४. संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दि.२३/०७/२०२४

उपरोक्त संदर्भांकीत शासन निर्णय क्र.२ अन्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या **आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील** नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि ,पशुसंवर्धन ,दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.**

तसेच, संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये, उपरोक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थाविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संचालनालयाचे परिपत्रक क्र.४ नुसार, विभागीय कार्यालयांना, शै.वर्ष २०२४-२५ पासून, मुलींना **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ** शासनामार्फत देण्यात येणार असून, संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकानुसार **आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील** विद्यार्थी/विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने, राज्यातील काही शैक्षणिक संस्थामार्फत मुलींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत सक्ती करण्यात येत आहे.

याबाबत मुलींना शासनास किंवा संचालनालयांस तक्रार करणेकरिता संचालनालयाच्या संकेतस्थळावर खालील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**Helpline Numbers -- 7969134440 / 7969134441**
**Helplinedesk Ticket Link -- helpdesk.maharashtracet.org**

याबाबत विभागीय सहसंचालकांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांपर्यंत याची माहिती त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

तसेच, सर्व सहसंचालक, विभागीय कार्यालये यांना उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने निर्देश देण्यात येत आहे की, विद्यार्थीनींकडून शैक्षणिक शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करणाऱ्या आपल्या अधिपत्याखालील संस्थांना व इतर सर्व संस्थांना प्रत्यक्ष भेट द्यावी व संबंधित संस्थेस समज द्यावी व अशा संस्थेवर कडक कारवाई करणे संदर्भात सुचना कराव्यात. जेणेकरुन या संदर्भात भविष्यात कोणत्याही विद्यार्थी / विद्यार्थीनीची तक्रार प्राप्त होणार नाही. तसेच, अशा संस्थांवर कारवाई करणे बाबतचा अहवाल संचालनालयास त्वरीत पाठवावा.

वरील सुचनांचे त्वरीत पालन करावे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

प्रत :- माहितीकरिता सादर.

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२.
२) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
३) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २ व १० तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
**शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०८ जुलै, २०२४.

**संदर्भ:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि.३१.०३.२०१६.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी २०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण -१, दि.३१.०३. २०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.०६.०४.२०२३

**प्रस्तावना :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्त्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचाराविनिमयाअंती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -:** राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized

Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांकडून आर्थिक तरतूदी सुधारीत करुन, सदर योजनेचा निधी हा संबंधित प्रशासकीय विभागांच्या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात यावा. तसेच, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क लाभाच्या अंमलबजावणीकरिता सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेश निर्गमित करावे.

४. मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करतांना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रा ऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

आ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. संबंधित प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे त्यांच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करावी. याव्यतिरिक्त योजनेच्या अन्य अटी-शर्ती व कार्यपध्दती कायम राहतील.

७. सदर शासन निर्णय हा दि.०५.०७.२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७०९१४२९३७४००८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SATISH JAGDERAO TIDKE

(सतीश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
५. मा.सभापती/उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
१३. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१६. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
१९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२७. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२९. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.मागणगांव, जि.रायगड
३०. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३३. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३४. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३५. महालेखापाल - १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३६. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४०. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४१. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४२. सर्वसंबंधित कार्यासने (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४३. निवडनस्ती/तांशि-४.

आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १९ जुलै, २०२४.

**वाचा:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि.१४.०२.२०१८.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

**शासन परिपत्रक :** उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रकियेद्वारे / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. आतापर्यंत व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना (मुले व मुली) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येत होती. परंतु, उपरोक्त वाचा क्र.०३ येथील शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित वरील प्रवर्गातील मुलींना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ५० टक्के ऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी, असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना वाचा क्र.०२ येथील परिपत्रकान्वये यापूर्वी दिलेल्या आहेत. असे असतानाही राज्यातील काही शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरत असल्याच्या किंबहुना शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थी, पालक, विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त होत आहेत.

३. वरील पार्श्वभूमीवर आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देताना, त्यांच्याकडून शिक्षण शुल्क न आकारण्याबाबत शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा.

२) शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन, संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे.

४. आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काच्या रकमेचा भरणा करावा.

५. संबंधित संचालनालयाने परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार-संलग्नित बँक खात्यात थेट जमा करावी. तसेच, शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करावी. प्रवेशाच्यावेळी संस्थांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, सदर रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करावी.

६. वरील सूचना संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व संचालक, कला संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या तसेच, विद्यापीठांच्या निदर्शनास आणून, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश द्यावेत. सदर सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुध्द कारवाई करावी.

७. संबंधित संचालकांनी सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी. तसेच, संचालनालयांच्या संकेतस्थळावर हे परिपत्रक प्रसिध्द करावे.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७१९१८५७३३५४०८ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SHAHAJAHAN SHAKUR MULANI

Digitally signed by SHAHAJAHAN SHAKUR MULANI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=[illegible], postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=[illegible], cn=SHAHAJAHAN SHAKUR MULANI
Date: 2024.07.19 19:09:01 +05'30'

**(शहाजहान मुलाणी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
८. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
९. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१०. सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
११. अवर सचिव (मशि-२ व तांशि-६), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती/तांशि-४.

Fle

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल§desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

<u>तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे</u>

क्र:- १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११
दिनांक :-२३-०७-२०२४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

**विषय: आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत ...**

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४.

तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३१० दि. २३/०७/२०२४ रोजीचे पत्र रद्द करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयांकित संदर्भीय १ चा शासन निर्णयान्वये व २ चा शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या **आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC)** प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि ,पशुसंवर्धन ,दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.**

तसेच संदर्भीय शासन निर्णय क्र. १ नुसार, वरील प्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात आले आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्याच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्य /संस्था प्रमुख यांना शासनाच्या संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकाच्या अनुषंगाने सूचना देण्यात याव्यात.

सोबत: संदर्भीय शासन निर्णय व शासन परिपत्रक .

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २ व १० यांना माहितीसाठी सादर.

Government of Maharashtra

Higher & Technical Education Department

# Tuition & Exam Fee Waiver for Girl Students

(Annual Income Below Rs. 8 Lakhs)


The scheme has been launched to benefit girl students in Maharashtra by providing a tuition and exam fee waiver.

The agenda is to increase the proportion of girls in professional education, ensuring they have equal opportunities for education. Under the initiative of women empowerment, the scheme aims to prevent girls from being deprived of professional courses due to a lack of financial support.

- Directorate of Higher Education
- Directorate of Technical Education
- Directorate of Arts

**Helpline Numbers:**
07969134440 & 07969134441

**Helpdesk Ticket Link:**
helpdesk.maharashtracet.org



Hon. Chief Minister | Hon. Dy. Chief Minister | Hon. Dy. Chief Minister | Hon. Higher & Technical Education Minister